दैनिक

# अदिती एक्सप्रेस

○ दि. २३ जानेवारी २०२६
○ शुक्रवार
○ वर्ष ४ थे
○ अंक ८४
○ किंमत २ रूपये
○ पृष्ठे ४
○ लातूर
○ RNINO.MHMAR/25/A1409

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in

## आजचे पंचाग

○ दिनांक : २३ जानेवारी २०२६
○ वार : शुक्रवार
○ माह (अमावस्यांत) : माघ
○ माह (पूर्णिमांत) : माघ
○ ऋतु : शिशिर
○ आयन : उत्तरायण
○ पक्ष : शुक्ल पक्ष
○ तिथी : पंचमी तिथी (२४ जानेवारी पहाटे ०१:४६ पर्यंत) त्यानंतर षष्ठी तिथी
○ नक्षत्र : पूर्वाभाद्रपदा नक्षत्र (दुपारी ०२:३२ पर्यंत) त्यानंतर उत्तराभाद्रपदा नक्षत्र
○ योग : परिघ योग (दुपारी ०३:५८ पर्यंत) त्यानंतर शिवा योग
○ करण : भाव करण (दुपारी ०२:१० पर्यंत) त्यानंतर बलवा करण
○ चंद्र राशी : कुंभ राशी (सकाळी ०८:३३ पर्यंत) त्यानंतर मीन राशी
○ सूर्य राशी : मकर राशी
○ अशुभ मुहूर्त:
○ राहु काळ : सकाळी ११:२७ ते दुपारी १२:५० पर्यंत
○ शुभ मुहूर्त:
○ अभिजित : दुपारी १२:२८ ते दुपारी ०१:१३
○ सूर्योदय : सकाळी ०७:१६
○ सूर्यास्त : सायंकाळी ०६:२५
○ संवत्सर : विश्वावसु
○ संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
○ विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
○ शक संवत: १९४७ शक संवत

## न्याय सहाय्यक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यातून मिळतोय जलद न्याय

मुंबई, दि.२२ : ' सर्वांसाठी न्याय.. जलद न्याय ' या तत्वावर राज्य शासन काम करीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाने जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायदान साखळीतील कमतरता दूर करण्यात येत आहे. नवीन फौजदारी कायद्याअंतर्गत जलद न्यायाला प्राधान्य दिले असून त्यानुसार न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येत आहे. त्यामुळे न्यायदानाची प्रक्रिया जलद झाली आहे.



न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत असलेली प्रलंबित प्रकरणे तातडे निकाले काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष मोहीम राबविण्याबाबत सूचित केले. तसेच त्यांनी नियमित आढावा घेत या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची प्रक्रिया गतिमान केली. संचालनालयकडील प्रयोगशाळांमध्ये मागील वर्षी २०२५ मध्ये एकूण १ लाख ८१ हजार प्रकरणे प्रलंबित होती. तसेच २ लाख ९४ हजार इतकी प्रकरणे आवक झाली. संचालनालयाने विशेष मोहिम राबवून डिसेंबर २०२५ अखेर ३ लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करून ७९ हजार ५४२ इतकी प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी केली आहे. विशेष मोहिमेअंतर्गत सर्व विभागांच्या प्रचलित मानकांमध्ये वाढ करून संचालनालयातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांचेकडून सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत कामाचे जादा तास वाढवून, शासकीय सुट्टीच्या दिवशी काम करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. संचालनालयातील कार्यरत मनुष्यबळाकडून कमीत कमी २ लाख ते २ लाख १५ हजार प्रकरणांचा निपटारा करण्याची क्षमता असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार ३ लाख ९६ हजार ८७९ इतक्या प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. प्रलंबित प्रकरणांपैकी १ लाख ०२ हजार ४१३ इतक्या जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यात संचालनालयाला यश आले आहे. डिसेंबर २०२५ अखेर प्रलंबित प्रकरणांपैकी ' कन्व्हेक्शनल फॉरेन्सीक' या विभागाने ३ लाख ९६ हजार २७५ इतक्या प्रकरणांचा निपटारा केला आहे. तसेच या विभागात २७ हजार ५२४ आवक प्रकरणांची संख्या असून फेब्रुवारी २०२६ पासून ज्या दिवशी प्रकरण आवक होईल, त्याच दिवशी प्रकरणांचे विश्लेषणाचे काम सुरू होईल, त्यामुळे दिवसेंदिवस प्रकरण प्रलंबित असण्याची बाब इतिहासजमा होऊन पिडीतांना जलदगतीने न्याय मिळण्याची व्यवस्था निर्माण होत आहे. संगणक गुन्हे विभाग, सायबर, ध्वनी व ध्वनीफित विभागातील प्रलंबित प्रकरणांचा निपटाराही जलदगतीने करण्यात येत आहे. (पान २ वर)

## मुंबई, पुण्यात महिलाराज : राज्यातील २९ महापालिकांच्या महापौर पदासाठी आरक्षण जाहीर



मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौर पदासाठीची बहुप्रतिक्षित आरक्षण सोडत अखेर आज मंत्रालयात पार पडली. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पूर्ण झाली. विशेषतः मुंबई, पुण्यासह अनेक मोठ्या शहरांमध्ये महिलांसाठी महापौर पद राखीव झाल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे.

सोडतीनुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ३ महापालिका, अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी १ महापालिका, इतर मागासवर्गीय ओबीसी प्रवर्गासाठी ८ महापालिका, तर खुल्या प्रवर्गातील १७ महापालिकांचा समावेश आहे. या निर्णयामुळे अनेक ठिकाणी सत्तेची गणिते बदलणार असून, पक्षांना नव्या महिला नेतृत्वाला पुढे आणण्याची संधी मिळणार आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी तब्बल १५ महापालिकांमध्ये महिला महापौर विराजमान होणार आहेत. ५० टक्के महिला आरक्षणाच्या नियमानुसार ही विभागणी करण्यात आली आहे. अहिल्यानगर, जळगाव, अकोला आणि चंद्रपूर या चार महापालिकांमध्ये ओबीसी महिला महापौर असतील. लातूर आणि नवनियुक्त जालना महानगरपालिकेत अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला महापौर पदासाठी आरक्षण निश्चित झाले आहे.

महापालिकानिहाय आरक्षण पाहिले असता, मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर, नाशिक, मालेगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नांदेड येथे खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण महिला आरक्षण लागू झाले आहे. ठाणे येथे अनुसूचित जाती प्रवर्ग, तर कल्याण-डोंबिवली येथे अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित झाले आहे. उल्हासनगर, पनवेल, अहिल्यानगर, जळगाव, अकोला, चंद्रपूर, कोल्हापूर आणि इचलकरंजी येथे ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण देण्यात आले आहे. नागपूर, अमरावती, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि वसई-विरार या महापालिकांमध्ये खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाले आहे.

मुंबईत ही नावे चर्चेत

विशेष लक्ष वेधून घेणाऱ्या मुंबई महापालिकेत महापौर पदासाठी खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण महिला आरक्षण जाहीर झाले आहे. या आरक्षणानुसार महापौर पदासाठी तेजस्वी घोसाळकर, योगिता कोळी, प्रीती सातम, अलका केरकर, स्वप्ना म्हात्रे, साक्षी दळवी, अर्चना भालेराव, अश्विनी मते, राखी जाधव, रितू तावडे, राजेश्री शिरवाडकर, शीतल गंभीर आणि हर्षिता नार्वेकर ही नावे संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहेत.

महापालिकानिहाय महापौर पदाचे आरक्षण

मुंबई सर्वसाधारण (महिला) नवी मुंबई सर्वसाधारण (महिला) ठाणे अनुसूचित जाती प्रवर्ग मिरा-भाईंदर सर्वसाधारण (महिला) कल्याण-डोंबिवली अनुसूचित जमाती प्रवर्ग (ST) उल्हासनगर ओबीसी प्रवर्ग वसई-विरार सर्वसाधारण भिवंडी-निजामपूर सर्वसाधारण (महिला) आरक्षण पनवेल ओबीसी प्रवर्ग नाशिक सर्वसाधारण (महिला) अहिल्यानगर ओबीसी प्रवर्ग महिलांसाठी राखीव मालेगाव सर्वसाधारण (महिला) जळगाव ओबीसी प्रवर्ग महिलांसाठी राखीव धुळे सर्वसाधारण (महिला) नागपूर सर्वसाधारण अकोला ओबीसी प्रवर्ग महिलांसाठी राखीव अमरावती सर्वसाधारण चंद्रपूर ओबीसी प्रवर्ग महिलांसाठी राखीव पुणे सर्वसाधारण (महिला) आरक्षण पिंपरी-चिंचवड सर्वसाधारण (महिला) (पान २ वर)

## चकमकीत ठार झाला एक कोटींचे बक्षीस लावलेला नक्षलवादी अनल दा, इतर १४ नक्षलवादीही ठार



रांची : गुप्तचर यंत्रणेने दिलेल्या माहितीआधारे सापळा रचून झारखंड पोलिसांनी सारंडाच्या घनदाट जंगलात अनेक नक्षलवाद्यांना चकमकीत ठार केले. पोलीस आणि नक्षलवादी यांच्यात झालेल्या चकमकीत एक कोटींचे बक्षीस लावलेला नक्षलवादी अनल दा ठार झाला. भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या शस्त्र हाती घेतलेल्या माओवादी गटाच्या केंद्रीय समितीचा सदस्य होता. पोलीस महानिरीक्षक मायकल राज यांनी नक्षलवादी अनल दा ठार झाल्याचे सांगितले. अनल दा व्यतिरिक्त आणखी किमान १४ नक्षलवादी ठार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सारंडात छोटा नागरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंभडीह गावाजवळच्या जंगलात चकमकीला सुरुवात झाली. अनल दा सहकाऱ्यांसह याच भागात असल्याची ठोस माहिती पोलिसांना मिळाली होती. ही माहिती मिळाल्यामुळे पोलिसांनी तातडीने सापळा रचण्यास सुरुवात केली होती. अखेर पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले. अनल दा ठार झाला. पोलिसांनी घटनास्थळावरुन आतापर्यंत एक एके ४६ रायफल, एक इन्सास रायफल, एक एसएलआर, शेकडो जिवंत काडतुसांचा साठा साठा हा शस्त्रसाठा जप्त केला. (पान २ वर)

## अटल पेन्शन योजनेस २०३१ पर्यंत मुदतवाढ

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने २०३०-३१ पर्यंत अटल पेन्शन योजनेचा विस्तार करण्यास मान्यता दिली. ज्यामुळे लाखो असंघटित आणि कमी उत्पन्न असलेल्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या निर्णयाचा थेट फायदा अशा कामगारांना होईल ज्यांच्याकडे निवृत्तीनंतर नियमित उत्पन्नाचा स्रोत नाही. अटल पेन्शन योजनेसाठी सरकारी मदत सुरू राहील. यामध्ये योजनेशी संबंधित प्रचार-प्रसार, क्षमता निर्माण व विकासात्मक उपक्रमांसाठी निधीचा समावेश आहे. योजनेची आर्थिक शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी, भविष्यातील पेन्शन पेमेंटमध्ये व्यत्यय येऊ नये याची खात्री करण्यासाठी गॅप फंडिंगला मान्यता देण्यात आली आहे. यात पात्र लाभार्थ्यांना वयाच्या ६० व्या वर्षांनंतर एक हजार रुपये ते पाच हजार रुपयांपर्यंतची हमी मासिक पेन्शन मिळते. ही योजना असंघटित क्षेत्रातील कामगार, रोजंदारी कामगार, (पान २ वर)

## पाकिस्तानमध्ये अग्नितांडव अख्खी इमारत जळून खाक




कराची : पाकिस्तानची आर्थिक राजधानी असलेल्या कराची शहरात एका बहुमजली इमारतीला लागलेल्या भीषण आगीने संपूर्ण देश हादरला आहे. या आगीतील बळींची संख्या आता ६१ वर पोहोचली असून, बचावकार्य जसजसे पुढे सरकत आहे, तसतशी मृतांची आकडेवारी वाढत आहे. या दुर्घटनेत एकाच दुकानातून अनेक मृतदेह हाती लागल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या आगीतील सर्वात वेदनादायक दृश्य 'दुबई क्रॉकरी' नावाच्या दुकानात पाहायला मिळाले. अग्निशमन दलाच्या जवानांना या एकाच दुकानातून तब्बल ३० मृतदेह सापडले आहेत.

३० जणांचा होरपळून मृत्यू

इमारतीला आग लागल्यानंतर आणि धूर पसरू लागल्यानंतर, स्वतःचा जीव वाचवण्यासाठी दुकानदार आणि ग्राहकांनी दुकानाचे शटर आतून ओढून घेतले होते. बाहेरून येणारी आग आणि धूर आत येऊ नये, या आशेने त्यांनी स्वतःला कोंडून घेतले; मात्र दुर्दैवाने त्याच बंद दुकानात धुरामुळे गुदमरून त्यांचा मृत्यू झाला. आगीच्या ज्वाळा इतक्या भीषण होत्या की इमारतीचा बराचसा भाग कोळसा झाला आहे. अनेक लोक अजूनही बेपत्ता असल्याची भीती व्यक्त केली जात असून, ढिगारा उपसण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. आतापर्यंत ६१ जणांचा मृत्यू झाला आहे. दुबई क्रॉकरी दुकानात ३० जणांचा गुदमरून मृत्यू झाला. धुरापासून वाचण्यासाठी शटर बंद केल्याने ऑक्सिजन संपला आणि गुदमरून मृत्यू ओढवला. सध्या मृतांचा आकडा अजूनही वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दुकानात शॉर्ट सर्किट झाल्याने ही आग लागल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले होते.

(पान २ वर)

## जम्मू काश्मीर : डोडा जिल्ह्यात लष्करी वाहनाला अपघात, १० जवानांचा मृत्यू



डोडा : जम्मू काश्मीरमधील डोडा जिल्ह्यात लष्करी वाहन जरीत कोसळले. या अपघातात दहा जवानांचा मृत्यू झाला.

तसेच अकरा जवान जखमी झाले.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार गुरुवार २२ जानेवारी रोजी जवानांची बुलेटप्रूफ कॅस्पिअर गाडी एका मोहिमेवर जात होती. प्रवासादरम्यान डोडा घाटात गाडी ४०० फूट खोल दरीत कोसळली. भदरवाह - चंबा खन्नी मार्गावरून जात असताना दरीत कोसळली. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी घटनेची माहिती मिळताच एक्स पोस्ट करुन शोक प्रकट केला. लष्करी वाहन दरीत कोसळल्याची माहिती मिळताच लष्कराने तातडीने मदतकार्य सुरू केले. जखमी जवानांना हेलिकॉप्टद्वारे उधमपूरच्या लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सर्व जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्रतिकूल हवामान असताना प्रवास सुरू होता. या प्रवासादरम्यान एका टप्प्यावर चालकाने नियंत्रण गमावले आणि वाहन दरीत कोसळले. या प्रकरणी नियमानुसार लष्करी अधिकारी तपास करत आहेत. अपघाताची सविस्तर चौकशी करुन अधिकारी वरिष्ठांना अहवाल सादर करणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, (पान २ वर)

## अलिबागचा हापूस मुंबईच्या बाजारात

नवी मुंबई : कोकणच्या मातीतून आलेला आणि चवीसाठी ओळखला जाणारा अलिबागचा हापूस अखेर मुंबईच्या बाजारात आला आहे. अलिबाग तालुक्यातील केतकीचा मळा येथील आंबा उत्पादक गौरव पाटील यांच्या बागेतील हापूसच्या दोन पेट्या नवी मुंबई एपीएमसीत दाखल झाल्या.

अलिबाग तालुक्यातील आंब्याला मोठी मागणी असते. भातशेतीसोबत आंबा लागवडीकडे अलिबागच्या शेतकऱ्यांचा कल वाढत असून तरुण शेतकरी आधुनिक पद्धतीने आंबा शेतीकडे वळत आहेत. यंदा पावसाने ऑक्टोबर अखेरपर्यंत हजेरी लावल्याने आंबा पिकासमोर अनेक अडचणी होत्या. मात्र कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य वेळी फवारणी व आंब्याचे झाड सुरक्षित राहिले. कठीण हवामानातही गौरव पाटील यांनी घेतलेल्या मेहनतीचे फळ म्हणजेच यंदाच्या हंगामातील पहिली आंब्याची पेटी बाजारात दाखल झाली.

यंदा पाऊस लांबणीवर गेल्याने मोठे आव्हान होते. तरीही योग्य देखभाल आणि मेहनतीमुळे आंबा लवकर तयार झाला. या हंगामातील पहिली हापूसची पेटी वाशी एपीएमसीला पाठवता आली, याचा आनंद आहे, असे गौरव पाटील आंबा उत्पादक यांनी सांगितले. अलिबागच्या आंब्याची आवक सुरु झाली असली तरी आंबा खवय्यांना सिंधुदुर्ग-रत्नागिरीच्या हापूस आंब्याची प्रतिक्षा असते.

## आता रात्रीही घेता येणार माता वैष्णोदेवीच्या प्राचीन गुहेचे दर्शन



कटरा : माता वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या लाखो भाविकांसाठी श्राईन बोर्डाने एक मोठा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर मंदिराची अत्यंत पवित्र आणि प्राचीन गुहा (पलळशपीं उरींश) भाविकांच्या दर्शनासाठी खुली करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, आता भाविकांना केवळ दिवसाच नव्हे, तर रात्रीच्या वेळीही या सुवर्णमयी गुहेतून मातेचे दर्शन घेता येणार आहे. श्री माता वैष्णोदेवी श्राईन बोर्डाने दिलेल्या माहितीनुसार, मकर संक्रांतीच्या विशेष पूजेनंतर सोन्याने मढवलेल्या या प्राचीन गुहेचे दरवाजे उघडण्यात आले. गेल्या मंगळवारी रात्री १०:३० ते १२:३० या वेळेत भाविकांनी या पवित्र गुहेतून दर्शन घेतले. डोंगराच्या नैसर्गिक रचनेतून तयार झालेली ही प्राचीन गुहा अत्यंत पवित्र मानली जाते आणि ती वर्षातून काही मोजक्याच काळासाठी भाविकांसाठी खुली केली जाते.

दर्शनासाठी नवीन वेळापत्रक जाहीर

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता, श्राईन बोर्डाने दर्शनासाठी दोन विशेष वेळा निश्चित केल्या आहेत.

(पान २ वर)

## नवी मुंबई महापालिकेत ७५० पदांची पोकळी

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेत काम करणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांची फौज सेवानिवृत्त झाली आहे. २०२६ या वर्षात आणखीन काही अधिकारी सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहेत. अशात महापालिकेत ७५० रिक्त जागांची पोकळी निर्माण झाली आहे.

नवी मुंबई महापालिका सध्या एका मोठ्या प्रशासकीय संक्रमणातून जात आहे. शहराचा विस्तार आणि नागरी गरजा वाढत असताना, गेल्या पाच वर्षात महापालिकेच्या सेवेतून मोठ्या संख्येने अनुभवी अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. या निवृत्तीमुळे निर्माण झालेली रिक्त पदे भरण्यासाठी प्रशासनाने आता कंबर कसली आहे. (पान २ वर)

## यंदा कर्तव्यपथावर अवतरणार गणपती बाप्पा



नवी दिल्ली : ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावर यंदा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख ठळकपणे दिसणार आहे. यावेळी महाराष्ट्राच्या वतीने सादर होणारा चित्ररथ गणेशोत्सवाच्या परंपरेवर आधारित असून, या उत्सवातून उभ्या राहणाऱ्या आत्मनिर्भरतेच्या संकल्पनेवर भर देण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या चित्ररथाची यंदाची संकल्पना 'गणेशोत्सव आणि स्वावलंबन' अशी असून, सार्वजनिक गणेशोत्सवाने समाजाला एकत्र आणण्याबरोबरच स्थानिक रोजगारनिर्मितीला कसा हातभार लावला आहे, याचे दर्शन घडवले जाणार आहे. या चित्ररथामध्ये मूर्तिकार, सजावट करणारे कलाकार, ढोल-ताशा पथके आणि विविध पारंपरिक घटक दाखवले जाणार आहेत.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विचारांची आधुनिक रूपरेषा या सादरीकरणातून मांडली जाणार आहे. सांस्कृतिक एकात्मता आणि आर्थिक स्वावलंबनाचा संदेश एकाच मंचावरून देशभरात पोहोचवण्याचा प्रयत्न या चित्ररथातून करण्यात आला आहे. दरवर्षी वेगवेगळ्या विषयांवर आधारित चित्ररथ सादर करणाऱ्या महाराष्ट्राने यापूर्वीही अनेक वेळा विशेष दखल घेतली आहे. मागील वर्षी महाराष्ट्राचा चित्ररथ गड-किल्ले आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासावर केंद्रित होता. यंदा मात्र उत्सव, परंपरा आणि रोजगार यांची सांगड घालणारी मांडणी पाहायला मिळणार आहे. कर्तव्यपथावर सादर होणारा हा चित्ररथ (पान २ वर) प्रेक्षकांसाठी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची आणि सामाजिक ताकदीची झलक ठरणार आहे.

# विक्षिप्त साम्राज्यवादी

साऱ्या जगात मनमानी पद्धतीने हस्तक्षेप करण्यासाठी भौगोलिकदृष्ट्या मोक्याच्या जागा आपल्या ताब्यात हव्यात, ही त्यांना लागलेली आस साम्राज्यवादाचं ढळढळीत लक्षण आहे. ट्रम्प यांची खरी आगपाखड ब्रिटनविरोधात नाही. ती भारताविरोधात आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांना भारताने पटवलं आणि त्यांच्याकडून एक संपूर्ण द्विपसमूह काढून घेतला, ही बाब ट्रंप यांना बोचते.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची जी घातक रूपं जगासमोर आली आहेत, त्यातलं सगळ्यात ठळक रूप आहे, विक्षिप्त साम्राज्यवाद्याचं. जगाने ॲडॉल्फ हिटलर या जर्मनीच्या क्रूरकर्मा, विक्षिप्त साम्राज्यवाद्याला पाहिलं आहे. त्याच्याविषयी भरपूर साहित्य आणि अभ्यास उपलब्ध आहे. त्यावर असंख्य चर्चासत्रं झडली आहेत. साम्राज्यवादी विक्षिप्त असतात, की विक्षिप्त सर्व सत्ताधीश झाल्यानंतर साम्राज्यवादी होतात, याचे उत्तर मानसतज्ज्ञांनी त्यात दिलं आहे. ट्रम्प यांच्या निमित्ताने त्या साऱ्या अभ्यासावरील धूळ पुन्हा एकदा झटकण्याची वेळ आली आहे, असं दिसतं. ग्रीनलँडसाठी डेन्मार्कला धमकावल्यानंतर ट्रम्प यांची वक्रदृष्टी आता हिंद महासागरातील दिएगो गार्सिया या बेटाकडे वळली आहे. मॉरिशसवरील ताबा सोडताना इंग्लंडने दिएगो गार्सिया हे बेटही मॉरिशसकडे सुपूर्द केलं, यावरून ट्रम्प यांनी मंगळवारी ब्रिटनचे पंतप्रधान किर स्टॅमर यांचे कान उपटले. गंमत म्हणजे, हे दिएगो गार्सिया बेट ज्या चागोस द्विपसमूहाचा भाग आहे, त्या द्वीपसमूहाबाबत गेल्याच वर्षी मे महिन्यात ब्रिटन आणि मॉरिशसमध्ये झालेल्या सामंजस्य करारावरून ट्रम्प यांनी स्तुतिसुमनं उधळली होती. 'ऐतिहासिक घटना' असं त्यांनी त्या करार प्रक्रियेचं वर्णन केलं होतं. घटनेला एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच तो सामंजस्य करार ट्रम्प यांना ब्रिटनचा मूर्खपणा वाटू लागला आहे. ब्रिटनने आपल्या 'सुरक्षेशी केलेली तडजोड' या शब्दात ट्रम्प यांनी परवा आगपाखड केली. डावोसला रवाना होण्यापूर्वी ट्रम्प यांनी मंगळवारी तीन गोष्टी केल्या : १) कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून बनवलेल्या नकाशात त्यांनी ग्रीनलँड, कॅनडा आणि व्हेनेझुएला या तीन स्वतंत्र भूभागांना अमेरिकेच्या नकाशाचा भाग बनवून टाकलं! २) फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युएल मॅक्रों यांनी ट्रम्प यांना पाठवलेल्या खासगी मेसेजना उघड केलं. राजनैतिक संकेतांचा हा मोठा भंग मानला जातो. ३) चागोस द्वीपसमूह मॉरिशसला दिल्याबद्दल त्यांनी ब्रिटनला बोल लावले. या द्वीपसमूहातील दिएगो गार्सिया हे बेट आपल्याला हवं, अशी उघड मागणी त्यांनी केली.

हे दिएगो गार्सिया बेट ब्रिटनने मॉरिशसकडे सोपवण्यामागे भारताची महत्त्वाची भूमिका आहे. हिंद महासागरात चीनला शह देण्यासाठी जागोस द्वीपसमूह मॉरिशसकडे असणं भारताच्या त्यातल्या त्यात सोयीचं असल्याने हा द्वीपसमूहही ब्रिटनने मॉरिशसचा ताबा सोडतानाच मॉरिशसला द्यावा, यासाठी विशेष प्रयत्न केले होते. दोन शतकांपेक्षा अधिक काळ ब्रिटनच्या अधिपत्याखाली असलेला मॉरिशस जेव्हा स्वतंत्र झाला, तेव्हा ब्रिटनने मॉरिशस सोडताना जो करार केला, त्यात दिएगो गार्सिया हे बेट मॉरिशसला दिलं, पण ९९ वर्षांच्या कराराने ते वापरण्यासाठी पुन्हा आपल्या ताब्यात घेतलं. या करारांमध्ये येती ९९ वर्षे तिथे ब्रिटन आणि अमेरिकी सैन्याचा तळ राहणार असला, ते ब्रिटनलाच वापरायला मिळणार असलं, तरी बेटावर मालकी हक्क मॉरिशसचाच राहणार आहे. ट्रम्प यांना हे मान्य नाही. त्यांच्या मते, या बेटाची; संपूर्ण चागोस द्वीपदी समूहाची मालकी आपल्याकडेच असायला हवी. आपली इच्छा त्यांनी आंतरराष्ट्रीय संकेतांच्या विपरीत, विक्षिप्तपणे मांडली असली, तरी या इच्छेतून त्यांच्यातला साम्राज्यवादीच डोकावतो आहे, हे लक्षात घ्यायला हवं. दिएगो गार्सिया हे हिंद महासागरातल्या चागोस द्वीप समूहातील साधारण ३० चौरस किलोमीटरचं. पण, हे बेट अशा मोक्याच्या जागी आहे, की या बेटावरून अमेरिका - ब्रिटनचं सैन्य एकाच वेळी आशिया, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या तीनही खंडांवर नजर ठेवू शकतं. बहुतेक सगळी तेलवाहू जहाजही मलाक्का आणि हार्मुज या सामुद्र धुनीतूनच प्रवास करतात. दिएगो गार्सिया बेट ताब्यात असेल, तर या जहाजांचा मार्ग केव्हांही रोखता येतो. म्हणजे, जगाच्या तेल पुरवठ्यावर नियंत्रण ठेवून सगळ्यांना वेठीस धरण्याची क्षमता प्राप्त होते! शिवाय, या द्वीपसमूहाच्या सागरी हद्दीत नांगरून ठेवलेली अमेरिकेची क्षेपणास्त्रवाहू जहाजं जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात वेगाने पोहोचू शकतात. इतकं महत्त्वाचं बेट ब्रिटनने मॉरिशसला दिलं आणि वार्षिक १०१ दशलक्ष पाऊंडाच्या भाडेकराराने ते पुन्हा ९९ वर्षांसाठी आपल्याकडे ठेऊन घेतलं. म्हणजे, आपल्या घरात आपणच भाडेकरू होण्याचा प्रकार. ट्रम्प यांना संताप अनावर झाला आहे तो त्यामुळे. साऱ्या जगात मनमानी पद्धतीने हस्तक्षेप करण्यासाठी भौगोलिकदृष्ट्या मोक्याच्या जागा आपल्या ताब्यात हव्यात, ही त्यांना लागलेली आस साम्राज्यवादाचं ढळढळीत लक्षण आहे.

ट्रम्प यांची खरी आगपाखड ब्रिटनविरोधात नाही. ती भारताविरोधात आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांना भारताने पटवलं आणि त्यांच्याकडून एक संपूर्ण द्वीपसमूह काढून घेतला, ही बाब ट्रम्प यांना बोचते आहे. भारताने पुढे जाऊन मॉरिशसला हाताशी धरून या दिएगो गार्सिया बेटाजवळच असलेल्या अगालेगा बेटावर आपल्या सैन्याच्या हालचालींसाठी काही सोयीसुविधा निर्माण केल्या आहेत. मॉरिशसला भागीदार करून भारताने चागोस द्वीपसमूहालगत एक उपग्रह संपर्क तळही उभारण्याचं नक्की केलं आहे. त्यासाठी मॉरिशसबरोबर करारही झाला आहे. या संपर्क तळावरून भारताला अमेरिका आणि चीन या दोघांच्याही हालचालींवर लक्ष ठेवणं शक्य होणार आहे. जगात कुठेही कोणीही आपल्या सुरक्षेचा स्वतंत्र विचार करायचाच नाही; सगळ्यांनी अमेरिकेच्या तालावरच नाचावं ही ट्रम्प यांची इच्छा संपूर्ण जगात असंतोष पसरवते आहे. संपूर्ण युरोप त्यांच्याविरोधात एकजुटीने उभा राहण्याची तयारी करतो आहे. युरोपीय समूहाच्या अध्यक्ष उर्सुला वान डेर लेयन, ग्रीनलँडचे अध्यक्ष जेन्स फ्रेडरिक नेल्सन, डेन्मार्कच्या मंत्री मेरी विएरे यांची गेल्या दोन दिवसांतली वक्तव्यं त्याची साक्ष आहेत. आशिया खंडात भारताचे शेजारी ट्रम्प यांच्यासमोर नांग्या टाकणारे असल्याने भारताची स्थिती थोडी अवघड आहे. भारत-चीन यांच्या संबंधात जी सुधारणा होते आहे, त्याचं कारणही ट्रम्पच आहेत. एका साम्राज्यवाद्याला रोखण्यासाठी भारताला दुसऱ्या छुप्या साम्राज्यवाद्याशी मैत्री करावी लागते आहे.

# मानवाच्या जीवनातील संघर्षाची कहाणी -आक्रोश

प्रा.पी.एस.बनसोडे यांचा आक्रोश हा लघुकथासंग्रह प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंडाची भाषा करणारा आहे. डॉ. बाबासाहेबांच्या घटनेची मूल्य रुजवणारा आहे. माणसात माणूस शोधणारा आहे. तसे पाहिले तर बनसोडे यांनी उच्चशिक्षण घेऊनही संघर्ष हा त्यांच्या पाचविला पुजलेलाच आहे.अनेक प्रसंगाशी, घटनांशी त्यांनी दोन हात केले. त्यामुळे ते सामाजिक परिस्थितीशी एकरूप होतात. लोकशाहीच्या नावाखाली समाजात हुकूमशाही कशी बाळसे पकडत आहे. नव्हेतर हुकूमशाहीचेच राज्य आहे हे ते उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेचा विषय माणूस हाच आहे. बनसोडे यांना माणसांना आत्मसन्मान मिळवून द्यायचा आहे. परंतु माणूस दारिद्र्याशी, जातीपातीशी, बेकारीशी, महागाईशी झुंज देत आहे.संघर्ष हा त्याच्या पाचविलाच पुजलेला आहे. त्यांचेच चिंतन करणारा लघुकथासंग्रह म्हणजे आक्रोश होय.

लघुकथा म्हणजे, एक छोटी काल्पनिक गद्यकथा होय. यामध्ये कादंबरी प्रमाणे कथानक,पात्रे, संवाद, घटक असतात. फक्त फरक एवढाच आहे की ती कमी शब्दात पण प्रभावी असतात. संक्षिप्तता, एकच केंद्रबिंदू, एकाच वेळी वाचन, गहन अर्थ आणि घटक ही लघुकथाची वैशिष्ट्य म्हणावी लागतील. ही लघुकथा सुरुवातीला मौखिक पद्धतीने रूढ झाली. त्यानंतर एडगर लन पो यांनी तिला एक निश्चित स्वरूप दिले. मराठी लघुकथेचे जनक म्हणून नारायण हरी आपटे यांना ओळखले जाते. दिवाकर कृष्ण यांनी या प्रकाराला स्वतंत्र ओळख करून दिली. गंगाधर गाडगीळ यांनी लघुकथांच्या माध्यमातून मराठी कथेला आशय, रचना आणि विचारांची नवी दिशा दिली.

याचाच धागा बनसोडे यांनी पकडून कमीत कमी शब्दातून मार्मिक उपदेश देणारा लघुकथा संग्रह लिहिला.

'आक्रोश' या लघुकथासंग्रहामध्ये एकूण १४ लघुकथा आहेत. या लघुकथा म्हणजे व्यवस्थेच्या विरुद्ध एक आक्रोश आहे. आपण ठरवतो एक आणि आपल्या जीवनात घडते एक. चांगले कर्म करणा-याच्या जीवनात अनेक अडचणी येतात. त्याला तोंड देत जगताना संघर्ष करावा लागतो. तो संघर्ष परिस्थितीशी असतो, व्यवस्थेची असतो, स्वभावासी असतो, आर्थिक समस्येशी असतो, जगाराशी असतो, रोजगाराशी असतो, बेकारीशी असतो, जातपात विषमतेशी असतो, राजकीय संघर्ष, सावकारी कौटुंबिक कलह, व्यसनाधिनता, मूल्यहिनता, अंधश्रद्धा, रूढी परंपरा अशा अनेक समस्यांच्या विरोधात असतो .याचा सामना करताना माणूस हतबल होतो. व्यवस्थेशी चार हात करताना तो भरडला जातो. यामुळे त्याची जगण्याची उमेद हरवून जाते. तो नाउमेद होतो. जगायचे म्हणून फक्त जगत असतो.




'आक्रोश' या कथेतील नामदेव आपल्या गरीब परिस्थितीमध्ये सुद्धा आपला भाऊ किशनला डॉक्टर करायचे स्वप्न पाहतो. किसनालाही परिस्थितीची जाणीव असल्यामुळे तो घर ते कॉलेज व आपला अभ्यास या पलीकडे कोणाच्याही संपर्कात नसतो. सगळा वेळ अभ्यासात घालतो. किसनाची आई कॅन्सरने गेली. तिने हे स्वप्न पाहिलं होतं म्हणून नामदेव ते पूर्ण करण्यासाठी जिवाचा आटापिटा करतो. परंतु परीक्षेच्या पुढे पुढे ताप येऊन किसना मरण पावतो. आणि नामदेवास पोरका करून तो आईकडे निघून जातो. इथे नामदेवाच्या स्वप्नांचा भंग होतो. तेव्हा तो आक्रोश करतो.अशी ही कथा काळीज पिळवटून टाकते. तर परिस्थितीने परवड झालेल्या भिवाची कहाणी 'परवड' ही कथा घेऊन येते. दुष्काळ पडल्यामुळे हाताला काम लागत नव्हतं तेव्हा सरपंच खटपट करत होता. 'शासनाच्या दुष्काळग्रस्त यादीत आपलं गाव येईल'असे वाटले होते. परंतु ते आलं नसल्यामुळे भिवा आणि मुकुंदा कामाच्या शोधात होते. गावातील सावकाराकडे काम आहे म्हणून ते त्याच्याकडे गेले. सावकाराने दिवसभर लाकडे फोडून घेऊन दोघांच्या हातावर प्रत्येकी १०० टेकवले. वाद केला तर सावकार वरून धमकी देऊ लागला. तेव्हा मुकुंदा म्हणाला, चल बाबा घराकडे. भिवा म्हणतो, चल, गरीबाच्या नशिबात कायमच परवड ठरलेली असते हे समाज वास्तव बनसोडे यांनी अधोरेखित केले.

तर शासनाच्या धोरणावर व संस्थापकाच्या वर्तनावर परखडपणे बोलण्याचे धाडस बनसोडे करतात. त्या अनुषंगाच्या तीन कथा 'तासिका', 'अनुदान',' पर्मनंट' या आलेल्या आहेत. मारुती कांबळे तासिका तत्वावर काम करतो.तो नेट सेट असतो.दिवसभर नोकरी परत रात्री बारवर नोकरी करून दिनचर्या भागवतो. कोणी भाजी विकून भागवतात. हे उच्चशिक्षिताचे जिने मनाला अस्वस्थ करते. तर अनुदान या कथेत प्राध्यापक अनुदान मिळेल या आशेवर वर्षानुवर्षे काम करतात. प्रामाणिकपणे अध्यापन करून निकाल चांगले देतात. त्याच्या लाचारी बद्दल लेखक म्हणतात, 'लाचार प्राध्यापक ','पुरोगामी महाराष्ट्रात घडतोय' आणि 'अनुदान आज ना उद्या मिळेल' या भाबड्या आशेवर जगतोय.हीच आशा त्याला जिवंत ठेवते. त्यात संस्थाचालक काम करून घेतात.परमनंट जागा निघेल तेव्हा जवळच्यालाच घेऊन काम करणाऱ्यांना काढून टाकतात. अशी उच्च शिक्षणाची परवड या कथांतून अधोरेखित झाली.

व्यसनामुळे अनेकांची घरे उध्वस्त झाली. अशाच आशयाची कथा 'व्यसन' ही आलेली आहे. आपली मुले हुशार असूनही दिलीप व्यसनात पक्का अडकतो.तो बायकोला मारहाण करतो, भांडतो आणि एके दिवशी तिच्या डोक्यात कुऱ्हाड घालून मारून टाकतो. अखेर त्याची आणि त्याच्यासारख्या अनेकांच्या संसाराची राखरांगोळी कशी होते यावर ही कथा प्रकाश टाकताना दिसते. तर लग्नावेळी मुलींचे सौंदर्य महत्त्वाचे ठरवून मुलींना नकार दिला जातो. याच विचाराची कथा म्हणजे 'रंग' ही होय. अरुणा काळी असते म्हणून तिच्या वर्गातला मुलगा तिला नाकारतो.पण लग्नावेळी एक सुंदर मुलगा जयेश तिला पसंत करतो.बनसोडे हे समाजातील काळ्या-गोऱ्या रंगाची दुरी कमी करतात. अंतरिक सौंदर्य महत्त्वाचे आहे हे पटवून देतात. जात-पात वंश, धर्म, रंग, रूप याच्या पलीकडे जाऊन एक चांगले जग असते हा व्यापक दृष्टिकोन जगासमोर ठेवणारी बनसोडे यांची कथा आहे.

स्वातंत्र्य मिळून एवढे वर्षे झाले तरी लोक जात-पात मानतात. हा अनुभव 'जयंती' या कथेतून येतो. डॉ.बाबासाहेबांच्या जयंतीच्या दिवशी मारामाऱ्या होतात. अनंताचं डोकं फुटल्यानंतर तो ओरडतो. इथे मदतीच्या आठ जात येते. प्रस्थापित लोकांच्या मनातील जात आणखीन जात नाही आणि हे अगदी खरेच आहे. तर नवीन लग्न झालेले असतानाही हळदीच्या अंगाने रणभूमीवर जाणारा सुरेश कारगील युद्धात शहीद होतो. आपल्या कुंटुंबापेक्षाही देशाला महान मानणाऱ्या सैनिकाची कहाणी देशप्रेम जागवते. कर्तव्य श्रेष्ठ याची आठवण करून देते.

बनसोडे यांच्या 'आक्रोश' या लघुकथा संग्रहातून मोजक्या शब्दात आशय व्यक्त झाला. या कथा ओघवत्या शैलीतून आलेल्या आहेत.सरळ,साधी भाषा,बोलके संवाद मनाला स्पर्श करून जातात. येथील पात्रे कधी संघर्ष करतात तर कधी परिस्थितीपुढे हात टेकवतात. डोळ्यामध्ये अश्रू आणतात तर कधी जगण्याचे बळ देतात. सुख भोगण्याचे दिवस येताच दुःखाचा डोंगर उभा राहतो. त्यावेळी दोन हात करतात. वाचताना मनात उत्कंठा वाढवतात.या कथा बोधकारक, उपदेशकारक, मूल्याची जपणूक करणाऱ्या आहेत. वाचक त्याचे नक्कीच स्वागत करतील. बनसोडे यांना पुढील लेखनासाठी हार्दिक शुभेच्छा!



समीक्षक
डॉ.नरसिंग अप्पासाहेब कदम
सदस्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य,मुंबई तथा प्रोफेसर छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय,उदगीर जि. लातूर.९४०४७३१०१०

पान १ वरून

### न्याय सहाय्यक...

न्यादान प्रक्रिया जलद झाल्यामुळे पीडितांना वर्षानुवर्षे न्यायासाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही. गतिमान न्याय दान करण्यासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाची महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संचालनालयाला अधिक सक्षम करण्यावर भर दिला आहे. राज्यातील प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला ' मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन' उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सर्वांचा परिपाक म्हणून न्यायदानाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होत आहे.

### चकमकीत ठार...

ग्रामस्थांच्या मदतीने मृतांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. अनल दा आणि त्याचे सहकारी गावाजवळच्या जंगलात असल्याची ठोस माहिती मिळाली. यानंतरच पोलिसांनी तातडीने सापळा रचण्यास सुरुवात केली होती. चकमकीत अनल दा ठार झाल्यामुळे आता एक कोटींचे बक्षीस असलेले दोनच नक्षलवादी झारखंडच्या जंगलात जिवंत आहेत. या नक्षलवाद्यांचा शोध सुरू आहे.

### अटल पेन्शन...

लहान व्यवसाय आणि ग्रामीण भागातील ज्यांना कोणत्याही औपचारिक पेन्शन सुविधेची सुविधा उपलब्ध नाही, अशा लोकांसाठी डिझाइन केलेली आहे.

### मुंबई, पुण्यात...

आरक्षण सांगली सर्वसाधारण कोल्हापूर ओबीसी प्रवर्ग इचलकरंजी ओबीसी प्रवर्ग सोलापूर सर्वसाधारण छत्रपती संभाजीनगर सर्वसाधारण परभणी सर्वसाधारण जालना अनुसूचित जाती प्रवर्ग महिलांसाठी राखीव लातूर अनुसूचित जाती प्रवर्ग महिलांसाठी राखीव नांदेड सर्वसाधारण (महिला)

### पाकिस्तानमध्ये अग्नितांडव...

७३ जण अजूनही बेपत्ता; मृतांमध्ये १६ चिमुरड्यांचा समावेश

या दुर्घटनेतील मृतांचा आकडा १०० च्या वर जाण्याची भीती प्रशासनाने व्यक्त केली आहे. सिंध प्रांतीय सरकारने अधिकृतरीत्या ७३ बेपत्ता व्यक्तींची यादी जाहीर केली असून, ढिगाऱ्याखाली आणखी मृतदेह असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या बेपत्ता लोकांमध्ये महिला, वृद्ध आणि विशेषतः लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सरकारने जाहीर केलेल्या ७३ बेपत्ता व्यक्तींच्या यादीत १० ते ६९ वयोगटातील नागरिकांचा समावेश आहे. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, यामध्ये किमान १६ अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. ही मुले एकतर या इमारतीमधील दुकानांमध्ये मजुरी करत होती किंवा पालकांसोबत खरेदीसाठी आली होती. या चिमुकल्यांच्या नशिबी असा दुर्दैवी अंत आल्याने संपूर्ण कराची शहर सुन्न झाले आहे. इमारतीमधील अग्निसुरक्षेचे उपाय कोणत्याही मानकानुसार (डींरपवरीवी) नव्हते, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. आपत्कालीन मार्ग नसणे, अग्निशमन यंत्रणांचा अभाव आणि अवैध बांधकामांमुळे आगीने भीषण रूप धारण केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे.

इमारतीचे ३ खटले न्यायालयात प्रलंबित होते, तरीही 'डेथ ट्रॅप' सुरूच राहिला

कराचीचे महापौर मुर्तजा वहाब यांनी स्पष्ट केले की, बाधित कुटुंबे आणि दुकानदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार मृतांची आणि बेपत्ता लोकांची प्राथमिक यादी तयार करण्यात आली आहे. मात्र, ढिगारा उपसणे आणि शोधमोहीम राबवणे हे अतिशय कठीण काम आहे. अग्निशमन दलाच्या अंदाजानुसार, संपूर्ण शोधमोहीम पूर्ण करण्यासाठी किमान १० ते १५ दिवसांचा कालावधी लागू शकतो. या दुर्घटनेनंतर पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने सखोल तपास सुरू केला आहे. इमारतीला परवानगी देणारे अधिकारी आणि मालक यांच्यावर कारवाईचे संकेत दिले जात आहेत. अनेक मृतदेह ओळखण्याच्या पलीकडे गेल्याने आता डीएनए चाचणीच्या माध्यमातून त्यांची ओळख पटवण्याची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

### जम्मू काश्मीर...

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी अपघाताची माहिती मिळताच शोक प्रकट केला. संरक्षणमंत्र्यांनी जखमींना आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत देण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

### आता रात्रीही...

भाविकांना आता सकाळी १०:१५ ते दुपारी १२:०० वाजेपर्यंत दर्शन मिळणार आहे तर रात्रीची वेळ १०:३० ते रात्री १२:३० वाजेपर्यंत असणार आहे. या नियोजित वेळेमुळे रात्रीच्या वेळी शांततेत आणि भक्तीमय वातावरणात दर्शन घेणे भक्तांना शक्य होणार आहे.

दोन दिवसांत ३१ हजारांहून अधिक जणांनी घेतले दर्शन

प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या दोन दिवसांत भाविकांचा ओघ सातत्याने वाढत आहे. २० जानेवारीला सुमारे १८,२०० भाविकांनी मातेचे दर्शन घेतलं. २१ जानेवारीला दुपारी ३ वाजेपर्यंतच १३,००० हुन अधिक भक्तांनी हजेरी लावली होती. थंडीचा कडाका असूनही भक्तांच्या उत्साहात कोणतीही कमतरता दिसून येत नाहीये, ज्यामुळे कटरा ते भवन या मार्गावर भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. एकाच वेळी हजारो भक्त भवन परिसरात पोहोचत असल्याने दर्शनाची प्रतीक्षा वेळ (थरळींळपस ढळाश) वाढू लागली होती. त्यावर उपाय म्हणून श्राईन बोर्डाने रात्रीचे दर्शन सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. रात्री १०:३० ते १२:३० या वेळेत पवित्र प्राचीन गुहेचे दरवाजे उघडले जात आहेत. यामुळे दिवसा होणारी गर्दी विभागली जाऊन रात्रीच्या वेळीही शांततेत दर्शन घेणे शक्य होत आहे. अधिकाधिक भक्तांना पवित्र गुहेतून दर्शन घेता यावे, यासाठी सुरक्षा व्यवस्था आणि स्वयंसेवकांची संख्या वाढवण्यात आली आहे.

वर्षातून दोनदा उघडते गुफा

माँ वैष्णो देवीची पवित्र गुहा वर्षातून २ महिन्यासाठी उघडले जाते. दरवर्षी सर्वसाधारण गुहा जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात उघडली जाते. कारण यावेळी मंदिरात भाविकांची गर्दी कमी असते. रोज सुमारे २० हजार श्रद्धाळू दर्शनासाठी माँ वैष्णोदेवीच्या दर्शनाला पोहचतात.

ऑनलाईन करा ( यज्ञ ) हवन

नोव्हेंबर २०२५ पासून भक्तांच्या सुविधेसाठी श्री माता वैष्णो देवी श्राईन बोर्डाने गर्भगृहात हवन करण्याची नविन सुविधा सुरु केली होती. ज्याअंतर्गत श्रद्धाळू आता ऑनलाईन आणि ऑफलाईन फीवरुन हवन ( यज्ञ ) करु शकतात. या हवनची फी प्रति श्रद्धाळू ३१०० आणि दोन श्रद्धाळूसाठी ५१०० रुपये ठेवण्यात आली आहे.

### नवी मुंबई...

२० जानेवारीच्या उपलब्ध असलेल्या प्रशासकीय माहितीनुसार, महापालिकेच्या आस्थापना विभागाकडून चालू वर्षातील सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. १ जानेवारी २०२५ च्या सेवाज्येष्ठता सूचीनुसार, तांत्रिक, वैद्यकीय आणि प्रशासकीय विभागातील अनेक वरिष्ठ अधिकारी यावर्षी निवृत्त होत आहेत. जरी संपूर्ण वर्षाची एकत्रित अधिकृत संख्या वर्षाच्या अखेरीस स्पष्ट होत असली, तरी दरमहा सरासरी २५ ते ३० कर्मचारी निवृत्त होत आहेत.

गेल्या पाच वर्षांत नवी मुंबई महापालिकेने अनुभवी नेतृत्वाची मोठी फळी निवृत्त होताना पाहिली आहे. मे २०२५ मध्ये एकाच वेळी ३१ अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांचा सेवानिवृत्ती सोहळा पार पडला होता. यामध्ये अतिरिक्त शहर अभियंता संजय खताळ, कार्यकारी अभियंता मनोहर सोनवणे आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. जया श्रीनिवासन यांसारख्या महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींचा समावेश होता.

# धाराशिव येथील मेनोपॉज क्लिनिकमध्ये महिलांची तपासणी सुरु - डॉ. चाकूरकर

धाराशिव (प्रतिनिधी) महिलांच्या आरोग्याला केंद्रस्थानी ठेवत धाराशिव येथील शासकीय रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयासह १३ आरोग्य संस्थेत मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक)' सुरू करण्यात आले आहे. हा उपक्रम महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरत आहे. सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर व राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून हे क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी एकूण २२१ महिलांची तपासणी करण्यात आली.

या अभिनव उपक्रमाला जिल्ह्यातील महिलांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून महिलांनी समाधान व कृतज्ञता व्यक्त केली आहे. मेनोपॉज हा आजार नसून महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे. मात्र, या काळात महिलांना शारीरिक व मानसिक आधाराची नितांत गरज असते. प्रत्येक महिलेला योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा या उद्देशाने मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले आहे. रजोनिवृत्ती हा महिलांच्या आयुष्यातील अत्यंत जिव्हाळ्याचा आणि संवेदनशील टप्पा असून या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण, हार्मोनल असंतुलन, हाडांचे आजार, झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर अनेकदा दुर्लक्ष झाले होते. यामुळे महिलांना शारीरिक, मानसिक, कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत होते. या समस्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी समुपदेशन व योग्य उपचाराचा प्रभावी पर्याय उपलब्ध करून दिला आहे. ही गरज ओळखून महिलांसाठी दर बुधवारी विशेष मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्याच्या शासकीय आरोग्य संस्थांना सूचना दिल्या. त्यानुसार जिल्ह्यात शहरी विभागातील जिल्हा रुग्णालय अंतर्गत उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये अशा एकूण १३ आरोग्य संस्थांमध्ये, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली १४ जानेवारी रोजी मकर संक्रांतीचे औचित्य

साधून 'मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक) ची अधिकृत सुरुवात करण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व महिलांनी आपल्या नजीकच्या शासकीय रुग्णालयात दर महिन्याच्या बुधवारी भेट देऊन मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक) चा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.

या क्लिनिकच्या माध्यमातून महिलांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन, हाडे, हृदय व हार्मोन तपासणी, औषधोपचार, आहार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन अशा सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, देशात प्रथमच अशा प्रकारचे मेनोपॉज क्लिनिक सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या आरोग्याबाबत महाराष्ट्राने उचललेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. मकर संक्रांतीनिमित्त महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून, महिलांच्या आरोग्याची गोड भेट म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# मराठी भाषा प्रगल्भ असून संवर्धन करणे काळाची गरज : शरद यादव

दै. अदिती एक्सप्रेस

कळंब: भाषा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या सहकार्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात बोलींचा जागर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




या विशेष कार्यक्रमाला मार्गदर्शन करताना शरद यादव (सहायक संचालक, भाषा संचालनालय, मंत्रालय, मुंबई)) म्हणाले, मराठी भाषा प्राचीन असून तिच्या इतिहासासोबत भौगोलिक क्षेत्र सामाजिक व सांस्कृतिक परंपरा यांचाही विकास होतो. भाषा संस्कृती रुजविण्याचे काम करते, पुढील पिढीस हा वारसा जतन करण्याचे सामाजिक भान आणून देण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा ठरतो. शासकीय आणि विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यामधून मराठी भाषा प्रगल्भ असून तिचे संवर्धन करणे काळाची गरज आहे मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त महाराष्ट्र शासनाने ३६ जिल्ह्यात बोलींच्या जागर आयोजित करण्यात आला आहे, याचाच एक भाग म्हणून मोहेकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय बोलीचा जागर हा कार्यक्रम राबविण्यात आला.

प्रारंभी भव्य ग्रंथदिंडी व शोभायात्रेच्या या माध्यमातून महाविद्यालयाच्या परिसरात बोली जगवा, बोली वाचवा, भाषा वाचवा, संस्कृती टिकवा, मी मराठी माझी मराठी या जयघोषात काढण्यात आली, यामध्ये शिवप्रसाद शर्मा व राज सरवदे यांनी महाराष्ट्रीयन लोककला लावणी, वाघ्या मुरळी, वेशभूषा व शाहीर बंडू खराटे यांनी बोलीभाषेवर पोवाडा सादर केला.

कार्यक्रमाचे सुरुवात महाराष्ट्र गीताने पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरुजींच्या प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उद्धाटन ज्ञान प्रसार मंडळ संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उदगीरी बोली अभ्यासक प्रसाद कुमठेकर दखनी बोली मिर्झा बेग, डी. के.शेख तसेच बोली कलावंत अनंत कदम, हनुमंत म्हेत्रे यांनी उदगिरी बोलीचे महत्व आपल्या मार्गदर्शनातून पटवून दिले.

याप्रसंगी शासनाच्या वतीने डॉ.आनंद गांगण (अनुवादक, मंत्रालय) यांनी मराठवाडा, विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्र म्हणजेच चांदा ते बांद्यापर्यंत भाषा संवर्धनाची ही जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. त्यासाठी निश्चितच शासनाची सहकार्याची भूमिका असल्याचे विशद केले.

व्यासपीठावर महेश लगड (अनुवादक, मंत्रालय), दिलीप लादे, (वरीष्ठ लिपिक, मंत्रालय) संचालक डॉ.डी.एस.जाधव, रमेश बोर्डेकर, डॉ.संजय कांबळे (अधिसभा सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ) अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हेमंत भगवान उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांना बोलीभाषा विषयक, आदर्श मराठी व्याकरण लेखन सारखे ग्रंथभेट व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यानिमित्ताने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल डॉ.अनिल फाटक व कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले. यावेळी विद्याभवन हायस्कूल, सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तसेच राहुल देशमुख, हभप महादेव महाराज आडसूळ, सोपान पवार, महादेव गपाट, संजय मोरे, डॉ.डी.एन.चिंते, डॉ.के.डबलु. पावडे, प्रा.बालाजी वाघमारे आदींनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरविंद शिंदे, संतोष मोरे, उमेश साळुंखे, आदित्य मडके, संदीप सूर्यवंशी व भारत शेळके यांनी सहकार्य केले. प्रास्ताविक डॉ.दादाराव गुंडरे, सूत्रसंचालन बोलींचा जागर कार्यक्रम समन्वयक प्रा.डॉ.दीपक सूर्यवंशी तर आभार उपप्राचार्य डॉ. के. डी. जाधव यांनी मांडले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. यावेळी विद्यार्थी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व भाषाप्रेमी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मतदारांना ईव्हीएमवर शंका असताना ईव्हीएमचा हट्ट का ? - थोरात

धाराशिव, (प्रतिनिधी) - देशासह महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाची मोठी घसरण झाल्याचे दिसत आहे. यामागे ईव्हीएम मशीन हेच कारण आहे. माजमा प्रत्येक निवडणुकीत ईव्हीएमच्या जोरावर सत्ता काबीज करत आहे. त्यामुळे ईव्हीएम मशीनऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्यात अशी मागणी काँग्रेस पक्ष सातत्याने करीत आहे. विशेष म्हणजे ईव्हीएम मशीनवरील मतदान प्रक्रियेवर मतदारांना शंका असताना ईव्हीएमचा हुड का ? असा थेट सवाल

करीत सत्ताधारी पक्षावर जबरदस्त टीकास्त्र कांग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तथा राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दि.२१ जानेवारी रोजी सोडले.

धाराशिव शहरातील हॉटेल किंग्ज गार्डन येथे पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी जिल्हा काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष विश्वास शिंदे, जेष्ठ जिल्हाध्यक्ष खलील सय्यद, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमेश राजेनिंबाळकर, विलास शाळू, नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, धनंजय राऊत, अभिषेक बागल, अक्षय जोगदंड, जयसिंग पवार, गन्सुर सय्यद, सरफराज काझी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना थोरात म्हणाले की, मागील अनेक निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाची मोठी घसरण दिसून आली असून यास फक्त ईव्हीएम मशीनवरील मतदान हेच कारणीभूत असल्याचे सांगितले. त्यामुळे आता जनतेमध्ये ईव्हीएम मशीनवरील मतदान प्रक्रियेवर संभ्रम निर्माण झाला असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच कळंब तालुक्यातील तांदुळवाडी येथे काही तरूणांनी ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान प्रक्रिया घेण्यात यावी या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या मागणीला काँग्रेस पक्षाचा पाठिंबा देण्यासाठी आपण त्यांची भेट घेतली असल्याचे सांगून ते म्हणाले की, काँग्रेस पक्षाची विचारधारा ही लोकशाहीला पूरक आहे. मात्र जाती पातीचे राजकारण करून सत्ताधारी पक्ष लोकशाहीला बाधक असे राजकारण करत असल्याचा अत्यंत गंभीर आरोप त्यांनी केला. विशेष म्हणजे शेतकयांची सांगितले.

कर्जमाफी, वीज बिल याबाबत केंद्र व राज्यातील सरकारने कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. त्यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य व्यावसायिक व जनतेच्या अडचणी वाढत असल्यामुळे सरकारने योग्य निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तर आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या विचारधारेला मानणार्या समविचारी पक्षांना सोबत घेवून पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यात येईल, असे थोरात यांनी सांगितले.

# पाडोळी (आ.) गटातून ॲड. अजित गुंड यांची भाजपकडे उमेदवारीसाठी मागणी

धाराशिव (प्रतिनिधी) जिल्हा परिषद निवडणुकीसाठी अजित व्यंकटराव गुंड पाटील यांना धाराशिव तालुक्यातील पाडोळी गटातून जिल्हा परिषदेची उमेदवारी द्यावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाकडे अधिकृत इच्छापत्र सादर केले आहे.

आ. राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजिसिंह ठाकूर, माजी आमदार बसवराज पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ता भाऊ कुलकर्णी, नितिन काळे, संताजी चालुक्य-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचा विकासाचा अजेंडा प्रभावीपणे राबवून पाडोळी गटाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार असल्याचे ॲड. गुंड यांनी स्पष्ट केले आहे. ॲड. गुंड हे रुपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक असून शेती, सहकार, उद्योग, बँकिंग व शिक्षण या क्षेत्रांचा समन्वय साधत त्यांनी ग्रामीण भागात सर्वसमावेशक विकासाचे कार्य उभे केले आहे. दूध प्रक्रिया, ऊस उत्पादन व अन्न प्रक्रिया उद्योगांमुळे शेतकरी, दूध व ऊस उत्पादक तसेच लघुउद्योजकांना आर्थिक स्थैर्य मिळाले आहे.

रुपामाता अर्बन व मल्टीस्टेट बँकेच्या माध्यमातून शेतकरी, महिला बचत गट व उद्योजकांना अर्थसाह्य उपलब्ध करून देण्यात येत असून समूहाच्या उपक्रमांमुळे धाराशिव, लातूर व बीड जिल्ह्यांत रोजगारनिर्मितीस चालना मिळाली आहे. तसेच पाडोळी, लासोना व धाराशिव येथे सुरू करण्यात आलेल्या शैक्षणिक संस्थांमुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे. ॲड. अजित गुंड यांना भक्कम सामाजिक व राजकीय वारसा लाभला आहे. त्यांचे चुलते सुधाकर गुंड गुरुजी हे जिल्हा परिषद धाराशिवचे माजी उपाध्यक्ष राहिले असून वडील ॲड. व्यंकटराव गुंड हे रुपामाता उद्योग समूहाचे चेअरमन व भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य आहेत. त्यांच्या मातोश्री माजी जिल्हा परिषद सदस्य असून आजोबांपासून संपूर्ण कुटुंब जनसंघ-भाजप परिवाराशी निष्ठेने कार्यरत आहे.

# निवडणुकीसाठी राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक

धाराशिव (प्रतिनिधी) जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने १९ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी उपजिल्हाधिकारी यांचे कक्षात राजकीय पक्षांचे अध्यक्ष व प्रतिनिधींची बैठक निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रा. महादेव वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे सतीश मातने, बसपाचे तुकाराम गवळी, राजपाल देशमुख, आकाश चौधरी दादा पाटील, एमसीएमसी नोडल अधिकारी विवेक खडसे, तहसीलदार (सामान्य), प्रकाश व्हटकर व नायब तहसीलदार सचिन पाटील यांची उपस्थिती होती.

श्री. कडवकर यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली असून निवडणूक कार्यक्रमाची सर्वसाधारण माहिती उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिली. निवडणूक कार्यक्रमाचा तपशील व कार्यक्रमाचा दिनांक, निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक अधिकारी, निवडणूक काळात काय करावे व काय करू नये, विविध कक्ष व त्यांचे नोडल अधिकारी, सुरक्षा कक्ष व मतमोजणीचे ठिकाण, प्रचारासाठी सर्वसाधारणपणे लागणारे विविध परवाने, विविध परवाने सुलभरित्या प्राप्त होण्यासाठी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात एक खिडकी कार्यान्वित करण्यात आली असल्याची माहिती श्री. कडवकर यांनी उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना दिली.

# श्री गुरु तेग बहादुर यांच्या समागम वर्षानिमित्त विविध स्पर्धा







धाराशिव (प्रतिनिधी) -हिंद-दी-चादर म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील श्री कुलस्वामिनी माध्यमिक आश्रमशाळेत २१ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांच्या माध्यमातून धर्म स्वातंत्र्य, मानवता, सहिष्णुता व बलिदानाचे मूल्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमांतर्गत वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जळकोट येथील महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव व माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक एस.एम. चव्हाण यांनी भूषविले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून एन.एम. गुरव उपस्थित होते. वकृत्व स्पर्धेमध्ये एकूण चार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या जीवन कार्य त्यांचे धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान व समाजासाठी दिलेला त्याग याविषयी प्रभावीपणे विचार मांडले. निबंध स्पर्धेसाठी एकूण २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून त्यांनी गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शौर्य, त्याग व मानवतावादी विचारांवर सविस्तर लेखन केले. गीत गायन स्पर्धेमध्येही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रेरणादायी गीतांचे सादरीकरण केले. यावेळी विद्यार्थ्यांना श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या जीवनावर आधारित माहितीपर डॉक्युमेंटरी दाखविण्यात आली. या चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या शहीदीचे ऐतिहासिक महत्त्व ३५० व्या शहीदी समागम वर्षाचे औचित्य आणि आजच्या समाजात त्यांच्या विचारांचे असलेले महत्व समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात एस.एम. चव्हाण यांनी श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या बलिदानामुळेच भारतात सर्व धर्मांना समान स्वातंत्र्य लाभले, असे सांगत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन जीवनात सत्य, धैर्य व मानवतेचे मूल्य जपावे, असे आवाहन केले. प्रमुख पाहुणे एन.एम. गुरव यांनीही गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या शौर्यगाथेचा उल्लेख करून अशा उपक्रमांमुळे विद्याथ्यर्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम व नैतिक मूल्यांची रुजवण होते, असे मत व्यक्त केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाण, अभिव्यक्ती कौशल्यांचा विकास तसेच सामाजिक व नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण झाली असून, शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# सामाजिक कर्तव्यांची जाणीव सर्वांनी अंगीकृत करणे आवश्यक - डॉ.बाबासाहेब ठोंबरे

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत लातूर येथे कार्यरत कृषि महाविद्यालय, विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषि तंत्र विद्यालय, गळीतधान्ये संशोधन केंद्र आणि विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानीमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजन दि. १६ ते २२ जानेवारी दरम्यान कृषि महाविद्यालयात करण्यात आले. आठवडाभर राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची सांगता भव्य रॅलीने करण्यात आली.




कृषि महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारापासून निघालेल्या भव्य रॅलीत विद्यार्थ्यांनी गुरु तेग बहादूर यांचा जयघोष केला व सामाजिक बांधिलकीबद्दल विविध घोषणा देत आजचा तरुण देशाच्या कर्तव्याप्रती दृढनिश्चयी असल्याचे दाखवून दिले. या प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे कृषि मुल्य आयोगाचे अध्यक्ष मा.ना.श्री.पाशा पटेल यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना श्री तेग बहादूर साहिब जी यांनी युध्दात दाखविलेले शौर्य व त्यानंतर सर्वधर्मियांच्या हक्कांच्या रक्षणासाठी तत्कालीन शासनकर्त्यांविरुध्द दिलेला लढा व लोकांच्या मनात रुजविलेला सेवाभाव या गुणांचा उल्लेख करुन हे गुण अंगी बाळगविण्याचे आवाहन केले. देशाचा विकास करावयाचा असेल तर लोकांनी दुस-या धर्माबद्दल आदर बाळगून सामाजिक सलोखा राखण्याची गरज त्यांनी नोंदविली. कार्यक्रमाचे अध्यक्ष अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी धार्मिक स्वातंत्र्यासोबतच सामाजिक कर्तव्याची जाणीव सर्वांनी ठेवावी असे सांगीतले. कृषिचे विद्यार्थिनी-विद्यार्थी सामाजिक जाणिवा प्रगल्भ करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ.अच्युत भरोसे यांनी आपल्या प्रास्ताविकात या उपक्रमांतर्गत आयोजीत केलेले विविध कार्यक्रम व विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धांचा आढावा सादर केली. कार्यक्रमास राष्ट्रपती पदक विजेते निवृत्त पोलीस उपनिरीक्षक श्री.सय्यद रहेमान चांद पाशा, निवृत्त सहाय्यक वनसंरक्षक शिवाजी गिरी, डॉ. मोहन धुप्पे, डॉ.व्यंकट जगताप, डॉ.अशोक घोटमुकले, लकी सिंग, श्याम सिंग हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी तसेच पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.(डॉ.) इंद्र मणि यांच्या प्रेरणेने व संचालक शिक्षण डॉ.भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.अनिलकुमार कांबळे यांनी केले तर आभार जिमखाना सचिव डॉ.दयानंद मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. विजय भामरे, डॉ. ज्योती देशमुख, डॉ.राजेश शेळके, डॉ.अनंत शिंदे, डॉ.महेंद्र दुधारे, डॉ.पद्माकर वाडीकर, डॉ. सुनीता मगर, डॉ.प्रभाकर अडसूळ, डॉ. ज्ञानेश्वर सुरडकर, डॉ.अमोल मिसाळ, डॉ.रमेश ढवळे, डॉ.अजित पुरी, डॉ.ममता पतंगे, श्री.भगवान कांबळे, डॉ.राहुल चव्हाण, डॉ.योगेश भगत, डॉ.विद्या हिंगे व राहुलदेव भवाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# समाजसेवा ही व्यक्तिमत्व विकासाचा पाया:प्राचार्य गरुड

मुरूम (प्रतिनिधी) - भारताला जगात महासत्ता बनवायचे असेल तर युवकांनी सामाजिक कार्यात पुढाकार घेतला पाहिजे. शिकणे, सेवा करणे आणि पुढे नेणे हीच तरुणांची त्रिसूत्री असून अशा शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, नेतृत्व गुण, सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. समाजसेवा ही व्यक्तिमत्व विकासाचा पाया असल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी दि.२१ जानेवारी रोजी केले.

उमरगा तालुक्यातील भुसणी येथे मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्यावतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या शाश्वत विकासासाठी युवक विशेष वार्षिक शिबिराप्रसंगी



उद्धाटक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी माजी प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, प्राचार्य डॉ. सादक वली, उपसरपंच दशरथ मंडले, श्रीमंत पाटील, सुभाष बिराजदार, राजेंद्र व्हनाजे, महादेव संगशेट्टी, महादेव व्हनाजे, महादेव पाटील, गुलाब हिरमुखे, मुख्याध्यापक प्रेमनाथ आपचे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस डॉ. गरुड यांनी पुष्पहार घालून अभिवादन करून कुदळ मारून उद्धाटन करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. गरुड म्हणाले की, आज युवकांमध्ये नैतिक मूल्यांचा ऱ्हास, वाढती स्पर्धात्मकता, बेरोजगारीमुळे तणावग्रस्त जीवन, वाढती व्यसनाधीनता, मोबाईलचा अतिरेकी वापर, अंधश्रद्धा या पार्श्वभूमीवर शिक्षणाकडे वस्तुनिष्ठ व सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. आज विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध असताना त्यांनी शिक्षणाबरोबरच मैत्रीपूर्ण जिव्हाळा निर्माण करावा. शिक्षणामुळे माणूस बौद्धिक दृष्ट्या सक्षम आणि प्रगल्भ बनतो, त्यामुळे जीवनमान सुधारते. संत गाडगेबाबा यांच्या कार्याची महती सांगताना भस्म, बुवा, जादूटोणा यांचा आता करूया त्याग. शिक्षण, विज्ञान आणि विवेक हाच समाजाचा भाग बनवूया असे त्यांनी सांगितले. तर डॉ बिराजदार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिबिराच्या प्रत्येक उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन आपली स्वतंत्र ओळख निर्माण करावी असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शीला स्वामी यांनी सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले यांनी व उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. कार्यक्रमास नागरिक नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दृष्टिहीनांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणाऱ्या डॉ. रामप्रसाद लखोटिया यांचा गौरव

दै. अदिती एक्सप्रेस
जयप्रकाश पाटील

उदगीर प्रतिनिधी – दृष्टिहीनांच्या शिक्षण, पुनर्वसन व अंधत्व निवारणाच्या कार्यात उल्लेखनीय योगदान देणारे उदगीर येथील ज्येष्ठ डॉक्टर, समाजसेवक तथा उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्ररुग्णालय, उदगीरचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया व सौ. स्मिता रामप्रसाद लखोटीया यांना सपत्नीक प्रतिष्ठेचा 'लुई ब्रेल पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




परतूर येथील लुई ब्रेल शिक्षण संस्था यांच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा दि. २१ जानेवारी २०२६ रोजी परतूर येथील इंदिरा मंगल कार्यालय (लालबहादूर शास्त्री कॉलेज रोड) येथे उत्साहात पार पडला. याच कार्यक्रमात संस्थात्मक श्रेणीत पुणे येथील 'माई बालभवन' या संस्थेलाही गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. स्वागतजी थोरात (संपादक रिलायन्स दृष्टी व स्पर्शज्ञान) होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व कवी श्री. इंद्रजीत भालेराव, लायन्स क्लब परतूरचे संस्थापक अध्यक्ष श्री. मनोहरजी खालापुरे, नगरसेवक व विवेकानंद सेवा केंद्राचे अध्यक्ष श्री. संदीपजी बाहेकर, जिल्हा समन्वयक श्री. राजेशजी ठाकूर तसेच सौ. स्वरूपा देशपांडे उपस्थित होते.

डॉ. लखोटिया यांनी उदगीर येथील 'अरुणा अभय ओस्वाल रिसोर्स सेंटर फॉर द ब्लाइंड' या केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपी, संगणक प्रशिक्षण, संगीत शिक्षण व स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मोफत उपलब्ध करून दिले आहे. सन २०१५ पासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे अनेक दृष्टिहीन विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी झाले आहेत. तसेच उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्ररुग्णालय यांच्या माध्यमातून मोफत नेत्रतपासणी शिबिरे, अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया व गरजू रुग्णांवरील उपचार सातत्याने राबविण्यात येत असून, लाखो रुग्णांना दृष्टी लाभली आहे.

सत्कारास उत्तर देताना डॉ. रामप्रसाद लखोटिया म्हणाले की, हा पुरस्कार माझा वैयक्तिक नसून समाजासाठी व दृष्टिहीन बांधवांसाठी कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचा आहे. दृष्टिहीन व्यक्तींना शिक्षण, आत्मसन्मान व स्वावलंबन मिळावे, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे उदगीर शहरासह लातूर जिल्ह्याच्या सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, डॉ. रामप्रसाद लखोटिया यांच्या कार्याबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी श्रीकृष्ण पाटोळे,विश्वनाथ काळे,रवींद्र जोशी,प्रा.राजेंद्र चव्हाण,प्रा. राजकुमार मुक्कावार,गणेश मुंडे,गिरी सर,विवेकानंद शाळेतील विद्यार्थी व परतुर नगरातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते

# सराईतांची टोळी जेरबंद; चोरलेले १७ मोबाइल जप्त



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : एमआयडीसी पोलिसांनी दोन मोबाइल चोरांना अटक करून आरोपींनी चोरलेले १७ मोबाइल, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि मोबाइल लॉक तोडण्यासाठी वापरलेले संगणक संच असा एकूण ४ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकूण चार आरोपींमध्ये एका विधी संघर्ष बालकासह मोबाइल शॉप मालकाचा समावेश आहे. त्यांच्याविरुध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सहायक पोलीस निरीक्षक बाळासाहेब विष्णू डोंगरे हे रविवारी सकाळी मॉर्निंग वॉकवरून परत घरी जात असताना एमआयडीसीतील शासकीय पोलीस वसाहत परिसरात दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या हातातील १ लाख १२ हजार ५०० रुपये किमतीचा मोबाइल हिसकावून पोबारा केला होता. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे डी.बी. पथक करीत होते. दरम्यान, घटनास्थळ शेजारचे सीसीटीव्ही फुटेज, गुन्ह्याची मोडस ऑपरेंडीचे विश्लेषण करून आरोपी निष्पन्न झाले. गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेऊन आरोपी विकास बाळू राठोड (वय २२, रा. कानडी बोरगाव, हा.मु. विकासनगर, लातूर), प्रजापती मुरलीधर सोनवणे (वय ४५, रा. वाल्मीकनगर, लातूर) व एक विधी संघर्ष बालक यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून सदर गुन्ह्यातील हिसकावलेल्या मोबाइलसह अन्य १६ मोबाइल, दुचाकी, संगणक संच असा एकूण ४ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यातील प्रजापती मुरलीधर सोनवणे हा संविधान चौक येथील सत्यम मोबाइल शॉपचा मालक असून गुन्ह्यातील मोबाइलचे पॅटर्न लॉक तोडून आरोपींना मदत करीत होता. तपासात सदर आरोपींनी मोबाइल चोरीच्या अन्य गुन्हेही कबूल केले आहेत. जप्त करण्यात आलेल्या मोबाइल धारकांचा शोध घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार आहे.पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनात एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक भाउसाहेब खंदारे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश पोगुलवार, डी.बी. पथकाचे सहायक पोलीस उपनिरीक्षक भीमराव बेल्लाळे, पोलीस हवालदार बळवंत भोसले, राजाभाऊ म्हस्के, रामभाऊ जाधव, अक्षय डिगोळे, विश्वनाथ डोंगरे यांनी ही कारवाई केली.

# छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात शताब्दी निमित्त कार्यक्रम संपन्न

(पाटील जयप्रकाश)

उदगीर –छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदी समागम शताब्दी निमित्त कार्यक्रम संपन्न झाला.

या निमित्ताने महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने श्री तेग बहादूर यांच्या त्याग , बलिदान , धर्म,स्वातंत्र्य व मानवतेच्या रक्षणासाठी दिलेल्या सर्वोच्च बलिदानाची माहिति विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने त्यांच्या जीवन चरीत्रावरील डॉक्यूमेंट्री विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली. सदरील कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य , सहिष्णूता व राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत व्हावी हा उद्देश पुढे ठेवून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रम प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ. अतिष आकडे ,डॉ. हरीभाऊ ढगे व डॉ. विश्वनाथ भालेराव यांनी आयोजित केला. याप्रसंगी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ज्येष्ठ नागरिक संघाला सर्वतोपरि सहकार्य करू : नगराध्यक्षा सौ.स्वाती हूडे

दै. अदिती एक्सप्रेस
(पाटील जयप्रकाश)




उदगीर प्रतिनिधी – ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने प्रतिवर्षा प्रमाणे मकरसंक्रांत निमित्त महिला मेळाव्याचे आयोजन विरंगुळा केन्द्रावर करण्यात आले. या कार्यक्रमास उदगीर च्या नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. स्वाती सचिन हूडे, उपाध्यक्षा सौ.शिन्दे, वार्ड नगरसेविका सौ.मीना कोठारे प्रमुख अथिती म्हणून उपस्थित होत्या.सर्व प्रथम नगराध्यक्षाच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष प्रा.रमाकांत मध्वरे हे उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक संघ महिला समिती तर्फे नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, नगरसेविका यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी नगराध्यक्षा सौ.स्वाती हूडे यानी आपल्या भाषणात ज्येष्ठ नागरिक हेच आमचे दैवत आहेत. त्याना आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन देऊन सत्कार केल्याबद्दल धन्यवाद दिले. या प्रसंगी उपाध्यक्षा सौ.शिन्दे ,नगरसेविका कोठारे यानी आपले मनोगत थोडक्यात मांडले. ज्येष्ठ नागरिक संघाचे मार्गदर्शक उद्योजक रमेश अण्णा अंबरखाने यानी मौलिक मार्गदर्शन करून न.प.तर्फे तसेच नागरिकांकडून ही अपेक्षित सहकार्य व्हावे. प्रशासन ,लोकप्रतिनिधी व जनता यांच्या संयुक्त सहकार्यातूनच कोणतेही कार्य व्यवस्थित होऊ शकते.नवनिर्वाचित अध्यक्षा, उपाध्यक्षा,नगरसेवका याना शुभेच्छा दिल्या. महिला समिती तर्फे श्रीमती कान्ता कलबूर्गे, श्रीमती शिवनंदा सोलापूरे, सुनंदा सरदार, श्रीमती शारदा एकंबे, श्रीमती तृप्ती पंडित, श्रीमती चंद्रकला बिरादार, यानी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमास नागरिक संघाचे मार्गदर्शक रमेश अण्णा अंबरखाने तसेच माजी अध्यक्ष व योगाचार्य डॉक्टर संग्राम पटवारी तसेच कार्यकारिणी पधाधिकारी सदस्य दीपक बलसूरकर ,मुरलीधर जाधव ,सुधाकर नळगीरकर, विश्वनाथ माळेवाडीकर,हकीम साहेब, अनिल पत्तेवार, व्हि .एस .कुलकर्णी धनराज बिरादार व ईतर सदस्य उपस्थित होते. शहरातील शेकडो माता भगिनींनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवून हळदी कुंक्रू तिळगूळ व वाण लुटीचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती. नेलवाडकर यानी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती डोळे यानी केले.

## लातूर स्थानकात गंठण हिसकावले

लातूर : बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका प्रवासी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनी गंठण लंपास केल्याची घटना लातूर येथे बसस्थानकात मंगळवारी सायंकाळी घडली. याबाबत गांधी चौक ठाण्यात गुन्हा दाखल केला. सणासुदीत दागिने हिसकावणारी टोळी सक्रीय झाल्याने महिलावर्गामध्ये चिंतेचे वातावरण आहे.

पोलिसांनी सांगितले, प्रभावती देवीदास घोगरे (७० रा. पाटील गल्ली, अहमदपूर) मंगळवारी सायंकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास लातूर-अहमदपूर बसमध्ये चढत होत्या. यावेळी असलेल्या गर्दीचा फायदा घेत, चोरट्याने त्यांच्या गळ्यातील जवळपास ५५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे गंठण चोरून नेले. गंठण चोरीला गेल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. याबाबत गांधी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तपास पोनि. सुनील रेजीतवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पी.ए. कोकणे हे करीत आहेत.

# दयानंद विज्ञानच्या रासेयो शिबिरात आरोग्य व रक्तगट तपासणी शिबिर




लातूर: येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे दावतपूर, ता. औसा येथे आयोजित विशेष वार्षिक युवक शिबिराच्या अंतर्गत आरोग्य तपासणी व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात डॉ. राहुल मोरे व डॉ. महेश करळे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व रक्तगट तपासणी केली. यावेळी डॉ. महेश करळे यांनी विद्यार्थ्यांना रक्तगटाचे प्रकार, रक्तगट माहिती असण्याचे महत्त्व, आपत्कालीन परिस्थितीत रक्तगटाची भूमिका तसेच रक्तदानाचे सामाजिक महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली.तसेच त्यांनी संतुलित आहार, नियमित व्यायाम व आरोग्यदायी सवयी अंगीकारण्याचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्न विचारले. या शिबिरात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मौजे दावतपूरच्या विद्यार्थ्यांची तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांची आरोग्य तपासणी व रक्तगट तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमास रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरज कोल्हे व डॉ. अमोल ठोसर, शाळेतील शिक्षकवृंद, माधव सूर्यवंशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक तसेच शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आरोग्य व रक्तगट तपासणी शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढून स्वतःच्या रक्तगटाबाबत माहिती मिळाली.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागाची नॅचरल शुगर फॅक्टरी येथे औद्योगिक भेट

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभाग व इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिलद्वारे दि.२० जानेवारी २०२६ रोजी नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज, रांजणी एन- साई) येथे एक दिवशीय औद्योगिक सहल व येडशी वन्यजीव अभयारण्य भेंट आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमात शिकविल्या जाणाऱ्या औद्योगिक व्यवस्थापन व प्रक्रिया प्रत्यक्ष जावून पाहता याव्यात व त्याद्वारे विद्यार्थ्यांना भविष्यातील वाटचालीसाठी मार्गदर्शन मिळावे हा उद्देश समोर ठेऊन विद्यार्थ्यांची औद्योगिक सहल आयोजित करण्यात आली होती.



एन- साई हा रांजणी येथील नामांकित साखर कारखाना असून येथे नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून सुरू असलेले साखरेचे उत्पादन व इतर जैव उपउत्पादन प्रक्रिया कशा पद्धतीने होतात याची सखोल माहिती विद्यार्थ्यांना सांगण्यात आली तसेच नॅचरल डेअरी येथे होणारे संकलन व प्रक्रिया त्याचबरोबर दुधापासून तयार होणारे इतर खाद्यपदार्थ याविषयीही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. साईचे चेअरमन श्री बी. बी. ठोंबरे, जनरल मॅनेजर श्री यू.डी. दिवेकर, लेबर ऑफिसर महादेव नाईकनवरे तसेब एच.आर. मॅनेजर सय्यद समीर यांनी या औद्योगिक मेटी दरम्यान मोलाचे सहकार्य केले.

महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, व जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित सदरील औद्योगिक भेटीत जैवतंत्रज्ञान विभागाचे बी. एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षाचे ५९ विद्यार्थी सहभागी होते. या भेटीदरम्यान प्रा.ऋतुजा डिग्रसकर,प्रा.स्वरूप गावकरे, प्रा. आऊ येळीकर शिक्षकेत्तर कर्मचारी विशाल टर्फे व लक्ष्मण शिंदे विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते.

# आवड व क्षमता ओळखून विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवावे- डॉ. गौरव जेवळीकर

दै. अदिती एक्सप्रेस
(जयप्रकाश पाटील)

उदगीर / प्रतिनिधी- उदगीर प्रतिनिधी, प्रत्येकात कांहीतरी क्षमता असतातच त्या क्षमता ओळखून विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवावे व ते ध्येय पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे असे प्रतिपादन डॉक्टर गौरव जवळेकर यांनी केले ते मातृभूमी महाविद्याल महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या आयोजित राज राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उषा कुलकर्णी या होत्या पुढे बोलताना डॉ जेवळीकर म्हणाले जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी आणि उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका, हे दोन महान विचार ज्यांच्या आयुष्याचे सार आहेत, अशा दोन थोर व्यक्तींना आज आपण वंदन करण्यासाठी येथे जमलो आहोत.



सर्वात आधी आपण वंदन करूया जिजाऊ माँसाहेबांना. जिजाऊ केवळ शिवबांच्या माता नव्हत्या, तर त्या स्वराज्याच्या खऱ्या शिल्पकार होत्या. ज्या काळात चहूकडे अंधार होता, परकीयांचे अत्याचार होते, त्या काळात त्यांनी शिवबांना केवळ युद्धाचेच नाही, तर अन्यायाविरुद्ध लढण्याचे आणि नीतिशास्त्राचे संस्कार दिले. त्यांनी मनात स्वराज्य उभारण्याचे स्वप्न पेरले, म्हणूनच आपल्याला 'छत्रपती शिवाजी महाराज' मिळाले.

दुसरीकडे, स्वामी विवेकानंद यांनी भारतीय संस्कृती आणि अध्यात्माची पताका संपूर्ण विश्वात फडकवली. १८९३ च्या शिकागो धर्मपरिषदेत त्यांनी माझ्या अमेरिकन बंधू आणि भगिनींनो अशी सुरुवात करून भारताच्या विशाल हृदयाची ओळख जगाला करून दिली. स्वामीजींचे विचार आजही तरुणांसाठी ऊर्जेचा स्रोत आहेत. ते म्हणायचे, स्वतःला कमकुवत समजणे हे सर्वात मोठे पाप आहे. मित्रांनो, जिजाऊंनी आपल्याला 'कर्तृत्व' शिकवले, तर स्वामीजींनी आपल्याला 'आत्मविश्वास' दिला. आजच्या युवकांसाठी या दोन्ही महापुरुषांचे विचार आत्मसात करणे काळाची गरज आहे. असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा बिभिषण मद्देवाड यांनी तर आभार प्रा रणजीत मोरे यांनी मानले केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्रा उस्ताद सय्यद, प्रा शिवांगी वट्टमवार, प्रा अन्वेश हिपळगावकर, प्रा जाई शर्मा, प्रा दीक्षा स्वामी, प्रा काकरे प्रतीक्षा, प्रा मीरा पाटील, प्रा राहुल जाधव, प्रा नेहा वाघमारे, ग्रंथपाल उषा सताळकर, जगदिशा ओंकारे, काळे अस्विनी, मादळे प्रदीप, दयानंद टाके, विवेक देवर्षे, मयुर मुळे, प्रकाश गायकवाड, मुबारक पटेल, अर्चना बिरादार व देवानंद डोंगरे यांच्यासह शिक्षक शिक्षेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.